जान-२४१-२०० (७/७४)

**महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२**
**अंतर्गत उद्‌भवणाऱ्या शंकांचे निरसन/स्पष्टीकरण**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : ममाअ-२००४/प्र.क्र.१३५/०४/०५,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६.१०.२००४

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम,२००२ ची अंमलबजावणी करताना शासकीय माहिती अधिकारी/अपिलीय प्राधिकारी यांना येत असलेल्या काही अडचणींबाबत संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी वेळोवेळी शासनास कळविले आहे. या अडचणीच्या मुद्‌द्यांवर विचार होऊन आता खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे :-

| क्र. | मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | कलम-७(च) खाली एखाद्या व्यक्तीच्या सेवा अभिलेखाशी संबंधित असलेली माहिती देता येणार नाही अशी तरतूद आहे. या कायद्याखाली कोणत्या प्रकारची माहिती देता येते किंवा देता येत नाही. | गोपनीय अहवालासंबंधीची माहिती देता येत नाही. मात्र, इतर प्रकारची माहिती देता येते. बदली किंवा नियुक्ती संबंधित माहिती देता येते. |
| २. | "अनियमित" निर्णय झालेल्या प्रकरणी माहिती देता येईल काय? | होय, जर निर्णय प्रक्रीया पूर्ण झाली असेल तर माहिती देता येईल. |
| ३. | शासकीय गुप्तता अधिनियम-१९२३ च्या तरतूदींमुळे जी उघड करण्यास मनाई केली आहे अशी माहिती देता येणार नाही. तरी या अधिनियमाच्या अंतर्गत कोणत्या प्रकारची माहिती देता येत नाही. | सदर कायदा साधारणत: देशाच्या संरक्षणाशी संबंधित कागदपत्रे व नकाशे, देशाच्या सार्वभौमत्व व एकात्मतेशी संबंधित कागदपत्रे, अंतर्गत सुरक्षितता, विदेशी राज्यांशी असलेले संबंध यावर परिणाम होईल, यासारख्या बाबींशी संबंधित आहे. सर्वसाधारण स्वरुपाचे शासनाच्या विविध विभागांचे दैनंदिन कामकाज या कायद्याखाली येत नाही. |
| ४. | एखाद्या प्रकरणात आपण सरकारी वकीलांचा सल्ला घेतो. त्या सल्ल्याची नक्कल माहितीच्या अधिकारात देता येते काय? जर शासकीय वकीलांनी सल्ल्याची माहिती दिली असेल तर ती पुन्हा अर्जदारांस द्यावयाची काय? | कलम-७ (ड) खाली सदर माहिती नाकारता येते. जर शासकीय वकीलांच्या व शासनाच्या परस्पर संबंधाखाली सरकारी वकीलांनी सल्ला दिला असेल तर अशी माहिती देता येणार नाही. सदर माहिती दिल्यास संबंधित प्रकरणी शासनाच्या बाजूवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असेल तर ती माहिती पुरविण्याचे नाकारण्यात यावे. |
| ५. | शासन निर्णयांच्या प्रतींची नक्कल देता येईल काय? | होय. |
| ६. | काही अर्जदार विविध प्रश्न व त्यावर करावयाची कार्यवाही याची माहिती मागतात. एखादा आदेश/निर्णय वैध आहे का? तसेच एखाद्या अनियमिततेसाठी जबाबदार कोण? अशी माहिती मागतात. | कलम-८(क) खाली सदर माहिती नाकरता येईल. तसेच शासनाच्या अभिलेखांमध्ये उपलब्ध असलेली माहिती कागदपत्रांच्या प्रतींच्या स्वरुपात पुरविणे अपेक्षित आहे. मुद्यांवरील मते कोणती कार्यवाही केली जाईल, इत्यादीचा समावेश माहितीच्या व्याख्येत होणार नाही व अशी माहिती देता येणार नाही असे यापूर्वीच दि.५.८.२००४ च्या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आलेले आहे. तसेच काही प्रकरणी माहिती पुरविण्यासाठी वरिष्ठांचे आदेश घेवून निर्णय घ्यावा लागतो व त्यास ३० दिवसांपेक्षा अधिक |

| | | |
|---|---|---|
| | | कालावधी लागतो, अशी माहिती ह्या कायद्याखाली पुरविणे अपेक्षित नाही. |
| ७. | पदाधिकारी यांनी दिलेल्या सुचनांची माहिती पुरवावी किंवा कसे? | होय, सदर माहिती पुरविता येते. |
| ८. | जी प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत त्याबाबत कागदपत्रे/ माहिती द्यावी काय? | जर एखाद्या न्यायप्रविष्ट प्रकरणाची माहिती दिल्यास कलम-७(अ) व (ख) खाली ज्यामुळे गुन्हेगारांचे अन्वेषण करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे यामध्ये अडथळा येईल, अशी माहिती देता येणार नाही. अशी माहिती दिल्यास शासनाची बाजू मांडताना त्याचा विपरीत परिणाम होणार असेल व न्यायालयाचा कोणत्याही प्रकारे अवमान होण्याची शक्यता असेल तर अशी माहिती देता येणार नाही. |
| ९. | जर शासकीय माहिती अधिकारी दीर्घ मुदतीच्या रजेवर असेल तर माहिती कशी पुरवावी? | शासकीय माहिती अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार धारण करणाऱ्या अधिकाऱ्याने माहिती पुरवावी. |
| १०. | शिक्षेची तरतूद माहिती अधिकाऱ्यांबरोबरच ती माहिती ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून घ्यावी लागते त्यांनासुध्दा शिक्षेची तरतूद लागू आहे काय? | होय. शासकीय माहिती अधिकाऱ्यांबरोबरच त्यांना माहिती ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून घ्यावी लागते त्यांनाही विलंब झाल्यास जबाबदार धरावे. |
| ११. | जर काही माहिती इंटरनेटच्या माध्यमातून वेबसाईटद्वारे उपलब्ध असेल तर ती नाकारता येईल काय? | होय. मात्र, वेबसाईटवरुन माहिती कशी घ्यावी व कोणत्या विषयाखाली ती उपलब्ध आहे याची माहिती अर्जदारास देण्यात यावी. (With details of Navigation) मात्र प्रत्येक ठिकाणी ही सुविधा उपलब्ध आहे का याचाही विचार करणे उचित ठरेल. |
| १२. | वैयक्तिक अग्रिमाबाबतच्या प्रतिक्षा यादीसारखी माहिती द्यावी काय? कारण यात व्यापक जनहिताचा मुद्दा लागू होत नाही. | जरी यात व्यापक जनहिताचा मुद्दा लागू होत नसेल तरी सदर माहिती शासनाच्या पारदर्शकता व स्वच्छ प्रशासनाशी संबंधीत असल्यामुळे पुरविण्यात यावी. |
| १३. | आवश्यक शुल्कासह अर्ज प्राप्त झाला नसल्यास अर्ज फेटाळता येणे शक्य आहे काय? तसेच अर्ज अपूर्ण, निनावी अथवा सहीशिवाय असल्यास फेटाळता येईल काय? | होय. मात्र, अर्जदाराला परिपूर्ण अर्ज करण्यास मार्गदर्शन करण्यात यावे. |
| १४. | काही कार्यालयांत माहिती व कागदपत्रे पुरविण्यासाठी प्रति पृष्ठ ५० पैसे पेक्षा जास्त खर्च येत असतांना व काही कार्यालयात झेरॉक्स, टंकलेखन यंत्र इत्यादी सुविधा नसतात अशावेळी काय शुल्क आकारणी करावी? | जर काही माहिती पुरविण्यास जास्त खर्च होत असेल तर कलम-६(२) खाली अर्जदारास कळवून त्यांच्याकडून वाढीव शुल्क आकारता येते. मात्र, प्रत्यक्ष झालेल्या खर्चापेक्षा जास्त शुल्क आकारण्यात येऊ नये. |
| १५. | नकारात्मक उत्तर देण्यापूर्वी प्रत्येक वेळी कलम-७(अ) खाली समितीची परवानगी घ्यावी लागेल काय? | नाही. ज्याप्रकारणी भारताचे सार्वभौमत्व व एकात्मतेशी संबंधित कागदपत्रे, अंतर्गत सुरक्षितता, विदेशी राज्यांशी असलेले संबंध यावर परिणाम होईल. म्हणजेच फक्त कलम ७ (क) नुसार माहिती देण्याचे नाकारावाचे असल्यास अशा प्रकरणी कलम-२(२) खाली गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीकडे प्रकरण पाठविण्याची गरज आहे. |

| | | |
|---|---|---|
| १६. | माहिती अधिकार कायद्याखाली काही कार्यालयात मोठया प्रमाणावर अर्ज येत आहेत. यामुळे नियमित शासकीय कामावर विपरीत परिणाम होतो. तसेच १५ दिवसांत माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही. | सक्षम प्राधिकारी यांना अधिक शासकीय माहिती अधिकारी नियुक्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. आवश्यक असल्यास, त्यांनी ज्या कार्यालयात जास्त अर्ज प्राप्त होत आहेत त्या कार्यालयात अधिक शासकीय माहिती अधिकारी नियुक्त करुन ही समस्या दूर करणे शक्य आहे. |
| १७. | काही संस्थांनी या कायद्याविषयी काही पुस्तिका छापलेल्या आहेत. त्या लोकांना पुरविण्याची व्यवस्था करावी. | प्रत्येक जिल्हधिकारी किंवा तहसील कार्यालयात, "सेतू" किंवा इतर योग्य स्थानिक संस्थांमार्फत अशा प्रकारच्या पुस्तिकांचे प्रकाशन व वाटप लोकांच्या सोयीसाठी करण्यात यावे. शक्यतो अशा पुस्तिका कमीत कमी दरात उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी व यासाठी सर्व संबंधित कार्यालय प्रमुखांनी पुढाकार घ्यावा. |
| १८. | नेमकी कोणती माहिती मिळविण्याकरिता कोणत्या अधिकाऱ्याकडे अर्ज करावा याबाबतची माहिती शासनाने उपलब्ध करुन द्यावी. | अशी माहिती संकलित करण्याचे काम यशदा, पुणे यांच्यामार्फत सुरु असून यास काही वेळ लागण्याची शक्यता आहे. तोपर्यन्त सर्व संबंधित कार्यालय प्रमुखांनी अशाप्रकारच्या माहितीच्या पुस्तिका सोप्या भाषेत तयार कराव्यात व विविध माध्यमातून यास प्रसिध्दी देण्यात यावी. काही मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या विभागाच्या वेबसाईटवर त्यांच्या योजनांची व कामाची अद्ययावत माहिती अजूनही प्रसिध्द केली नाही, ती लवकरात लवकर करावी. |
| १९. | कार्यालयीन टिप्पणीत किंवा इतर कागदपत्रांवर लोकप्रतिनिधी यांनी दिलेले आदेश किंवा शेरे याच्या प्रती सदर अधिनियमाखाली देण्यात याव्यात काय? | होय, जर अधिनियमाच्या कोणत्याही कलमांच्या तरतूदीखाली द्यावयाच्या माहितीला सूट देण्यात आली नसेल तर ती माहिती देण्यात यावी. |
| २०. | अधिनियमात लेखी स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. याचा अर्थ असा गृहीत धरावा काय? की, अधिकारी तोंडी स्वरुपात माहिती देण्यास नाकारु शकतात? | नाही. शासन व्यवहारात पारदर्शकता आणण्याच्यादृष्टीने सदर कायदा करण्यात आलेला आहे. शासकीय कार्यालयातून इतर सर्वसाधारण मार्गाने लोकांना माहिती उपलब्ध होत नसल्यामुळे सदर कायदा लागू करण्यात आला आहे. तोंडी स्वरुपात किंवा इतर सर्वसाधारण मार्गाने अर्जदारास माहिती देण्यास सदर कायद्यात कोणताही प्रतिबंध नाही. |
| २१. | काही इतर कायदा/नियमांतील विशिष्ट शुल्कांची आकारणी करण्यात येते. (उदा.काही कागदपत्रांच्या प्रती देण्यासाठीचे शुल्क इत्यादी) अशा प्रकरणी या अधिनियमातील तरतूदींप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात यावी किंवा माहितीच्या अधिकार अधिनियमाप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात यावी? | एखाद्या प्रकरणी यापैकी ज्या अधिनियमाखाली अधिक शुल्क प्रस्ताविण्यात आले आहे त्या शुल्काची आकारणी करण्यात यावी. |
| २२. | काही अर्जदार हे नागरीक नसून संस्था/संघटना किंवा त्यांचे प्रतिनिधी/पदाधिकारी असतात. त्यांना माहिती मागण्याचा अधिकार आहे काय? | होय, जर एखादा नागरिक एखाद्या संस्थेचा सभासद असेल किंवा पदाधिकारी असेल आणि त्याने त्या संस्थेच्या लेटरहेडवर अर्ज केला असेल तरी तो नागरिक या संज्ञेत मोडतो व त्याला माहिती मागण्याचा अधिकार आहे. |

| | | |
|---|---|---|
| २३. | अधिनियमाच्या कलम-९(१)-ब खालील तरतूदींचा बोध होत नाही. या कलमाखाली १५ वर्षापूर्वी झालेल्या बाबीं संदर्भात कोणतीही माहिती पुरविण्याची तरतूद आहे. | १५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त जुने सर्व शासकीय अभिलेख कोणत्याही व्यक्तीला उपलब्ध व्हावेत हा या कलमाचा हेतू आहे. म्हणजेच जरी एखाद्या प्रकरणात कलम ७ किंवा ८ च्या तरतूदी लागू होत असतील तरी सदर प्रकरण १५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त जुने असल्यास त्याबद्दल माहिती पुरविणे बंधनकारक आहे. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
( वंदना कृष्णा )
शासनाचे सचिव.

---

क्र.सीपीए/२१५० दि.६.११.२००४
कृपया वितरीत करावे.
सही/-
( ए.जी.हिरे )
उप आयुक्त (सा.प्र.)

क्र.एमओएम/५२२३ दि. १०.११.२००४.

प्रत : ------------------------------------------------------यांना माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

रचना व कार्यपध्दती अधिकारी
( आयुक्तांचे कार्यालय )

प्रमुख कर्मचारी अधिकारी

---०---